# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/02/2023 (शनिवार) सकाळ

---

## खूनाचा प्रयत्न

**पो.स्टे. बुट्टीबोरी** :- अंतर्गत ०२ कि. मी अंतरावरील बुटीबोरी ते हनुमान नगर, वार्ड क्र. ६, बागडे आटाचक्की जवळ दिनांक ०३/०२/२०२३ चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे- सौ. निशा शंकरराव भगत, वय २३ वर्ष, रा. हनुमान नगर वार्ड क ६ बागडे आटाचक्की जवळ जि. नागपूर व आरोपी नामे- शंकर मधुकर भगत वय ३६ वर्ष, रा. हनुमान नगर वार्ड क्र. ६ बागडे आटाचक्की जवळ ता. जि. नागपूर हे पती पत्नी असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी आरोपी याने शेतीचे ठेक्याचे मिळालेले पैशावरून राहते घरी फिर्यादी सोबत वाद करून मारणेस धावला असतांना यातील फिर्यादीचे सासरे हे मधात येवुन आरोपी मुलाला तिला कशाला मारतो असे बोलुन घराबाहेर गेले. त्यानंतर आरोपी मुलगा सुनेसोबत भांडण करित असल्याचे सासरे जखमी नामे- मधुकर अण्णाजी भगत वय ५० वर्ष रा. हनुमान नगर वार्ड क ६ बागडे आटाचक्की जवळ तार. जि. नागपूर हे मोबाईलवरून आपले पत्नीला सांगत होते त्याकारणावरून आरोपीने घराशेजारील सुरू असलेल्या घर बांधकावरील पावडा घेवुन जखमीला डोक्यावर मागचे बाजुला मारून गंभीर जखमी करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर पो.स्टे. बुटीबोरी मो. क्र. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :- अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा चिचभवन येथे दिनांक ०१/०२/२०२३ चे ११.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- मांगिलाल सुखराम उईके, वय २४ वर्ष, रा. चिचभवन ता. पारशिवनी व फिर्यादीची आई हे आपआपले कामावर घरून निघुन गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या घराचा दरवाजा नसलेल्या खुल्या घरातुन बॅगमध्ये ठेवलेले नगदी १२२७०/- रु. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार बरखडे ब. नं. ५०३ पो.स्टे पारशिवनी मो. क्र. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

# दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा लिंगा येथे दिनांक ०१/०२/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. उज्वला प्रशांत किरपाल, वय २४ वर्ष रा. लिंगा व आरोपी नामे– १) पती प्रशांत किरपाल २) सासु सौ. कुसुम किरपाल ३) सासरे धनराज किरपाल हे सख्खे नातेवाईक असुन घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे सासु, सासरे यांनी पोटातला गर्भ पाडुन टाक असे म्हटले असता फिर्यादीने नकार दिल्याने सासु, सासरे यांनी फिर्यादीला गालावर थापडाने मारहाण केली व पतीला सांगितले असता पतीने देखील शिवीगाळ करून फिर्यादीचे डावे कानावर थापडा मारल्या व डोक्यावर बुक्कीने मारल्याने त्यामुळे फिर्यादीचा डावा कान व डोके दुखत असल्याचे सांगितले असता फिर्यादीस ग्रामिण रूग्णालय कळमेश्वर येथे पाठविले असता डॉक्टरांनी मेडिकल येथे रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपूर डॉक्टरांनी तपासून कानाचा पडदा फाटल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ३४ भादवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १६२८ बंडु कोठे मो. नं. ७७०९८१९६२६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**